## सीरियातून भारतीय नागरिकांचे निर्वासन

11 डिसेंबर 2024

सीरियातील ताज्या घडामोडीनंतर भारत सरकारने आज 75 भारतीय नागरिकांना सीरियातून बाहेर काढले. या निर्वासितांमध्ये जम्मू आणि काश्मीरमधील 44 'झैरीन' यांचा समावेश आहे जे सय्यदा झैनब येथे अडकले होते. सर्व भारतीय नागरिक सुरक्षितपणे लेबनॉनला पोहोचले आहेत आणि उपलब्ध व्यावसायिक विमानांनी भारतात परततील.

2. दमास्कस आणि बेरूत येथील भारतीय दूतावासांनी समन्वयित केलेले निर्वासन, सुरक्षा परिस्थितीचे आमचे मूल्यांकन आणि सीरियातील भारतीय नागरिकांच्या विनंतीनंतर अंमलात आणण्यात आले.

3. भारत सरकार परदेशातील भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेला आणि सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देते. सीरियामध्ये राहिलेल्या भारतीय नागरिकांना अद्यतनांसाठी त्यांच्या आपत्कालीन हेल्पलाईन क्रमांक +963 993385973 (व्हॉट्सअॅप वर देखील) आणि ईमेल आयडी (hoc.damascus@mea.gov.in) वर दमास्कसमधील भारतीय दूतावासाच्या संपर्कात राहण्याचा सल्ला दिला जातो. सरकार परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवणार आहे.

**नवी दिल्ली**

**11 डिसेंबर 2024**